1) लोकसत्ता पु. पान क्र. 1 दि. 19/01/2023

# दर शनिवारी पोलीस ठाण्यांत नागरिकांच्या तक्रारींचे निवारण

## पोलीस निरीक्षकांना आयुक्तांच्या सूचना

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसई-विरार व मीरा-भाईंदर शहरातील नागरिकांच्या तक्रारींचे निवारण दर शनिवारी प्रत्येक पोलीस ठाण्याच्या ठिकाणी होणार आहे. पोलीस निरीक्षकांनी व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी त्या ठिकाणी थांबून नागरिकांचे म्हणणे समजून घेण्यात यावे अशा सूचना पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय यांनी दिल्या आहेत.

नागरिकांच्या असलेल्या समस्या सोडविण्यासाठी पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय यांनी पुढाकार घेतला आहे. आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील वसई, माणिकपूर, वालीव, विरार, तुळींज, आचोळे, नालासोपारा, अर्नाळा, पेल्हार, मांडवी, नवघर भाईंदर, नयानगर, काशीमिरा, भाईंदर, मिरारोड कनाकीया, उत्तन अशा सर्वच पोलीस ठाण्यात आठवड्यातील प्रत्येक शनिवारी सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे निवारण केले जाणार आहे.

यासाठी दर शनिवारी पोलीस निरीक्षकांनी पोलीस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी व त्यांना भेटण्यासाठी थांबावे अशा सूचना आयुक्तांनी केल्या आहेत. या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे निवारण होऊन त्यांना दिलासा मिळू शकेल, असेही आयुक्तांनी सांगितले आहे.



### सावध राहा

सध्या शहरात ऑनलाइन फसवणूक होण्याच्या घटना समोर येत आहेत. विशेषतः बँकेच्या संबंधित व वीज देयक भरले नाही वीजपुरवठा खंडित होईल अशा भूलथापा देणारे मेसेज पाठवून फसवणूक होत आहे. येणाऱ्या कोणत्याच लिंक उघडून बघू नका. यातून फसवणूक होऊन आर्थिक नुकसान होऊ शकते. यासाठी नागरिकांनी ऑनलाइन होणाऱ्या फसवणुकीपासून सावध रहा, असे आवाहन पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय यांनी शहरातील नागरिकांना केले आहे.

2) लोकसत्ता पु. पान क्र. 1

# पोलीस ठाण्यातील 'स्वागत कक्ष' बंद

## मनुष्यबळाची कमतरता

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरातील सहा पोलीस ठाण्यांत उभारण्यात आलेले 'स्वागत कक्ष' हे अवघ्या तीन वर्षांत बंद झाले आहेत. मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे हे कक्ष बंद करावे लागण्याची नामुष्की पोलीस प्रशासनावर ओढवली आहे. तर भरती प्रक्रिया सुरू असून पुरेसे मनुष्यबळ प्राप्त झाल्यांतर हा उपक्रम सुरू केला जाईल, असे पोलीस आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे.

सामान्य नागरिकांना विविध तक्रारींसाठी पोलीस ठाण्यात जावे लागते. त्यामुळे पोलीस आणि नागरिकांमधील संवाद मैत्रीपूर्वक व्हावा या हेतूने शहरातील सर्व पोलीस ठाण्यांत 'स्वागत कक्ष' उभारण्यात आले होते. हे कक्ष पोलीस ठाण्याच्या बाहेर अथवा प्रवेशद्वारावरच तयार करण्यात आले होते. त्यामुळे या कक्षाला चांगला प्रतिसाद मिळत होता. मात्र आता हे स्वागत कक्ष बंद करण्यात आले आहेत.

शहरात नवघर, नया नगर, काशीमिरा, मीरा रोड, भाईंदर आणि उत्तन अशी सहा पोलीस ठाणी असून त्यात एकूण ९५ अधिकारी आणि ३६८ कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ कार्यरत आहे. त्यामुळे सरासरी एका पोलीस ठाण्यात केवळ ६० पोलिसांचा फौजफाटा आहे. यातील २० कर्मचारी कार्यालयीन कामात, १० कर्मचारी हे विशेष व्यक्ती सुरक्षेसाठी, १० कर्मचारी पोलीसभरतीच्या कामात तर उर्वरित २० कर्मचाऱ्यांवर संपूर्ण तक्रारीचे निवारण करण्याचा बोजा आहे.

त्यामुळे स्वागत कक्ष अथवा इतर अन्य उपक्रम राबवण्यासाठी पोलिसांकडे मनुष्यबळच उपलब्ध नाही. त्यामुळे नाइलाजाने पोलिसांना स्वागत कक्षाचा उपक्रम बंद करावा लागला.

> **मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या प्रथम पोलीसभरती प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. ती पूर्ण झाल्यास साधारण नऊशेहून अधिक मनुष्यबळ आपल्या ताफ्यात समाविष्ट होणार आहे. त्यामुळे ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पोलीस ठाण्यातील रखडलेले उपक्रम मार्गी लावण्याचे काम केले जाईल.**
>
> **- प्रकाश गायकवाड,** उपायुक्त, पोलीस आयुक्तालय

CamScanner

दि. १९/०१/२०२३

3) लोकसत्ता पु. पान क्र. 4

# लंपास केलेली रक्कम पोलिसांमुळे परत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** महावितरण कंपनीचे वीज देयक भरण्याच्या नावाखाली सायबर भामट्याने वीज ग्राहकाचे लंपास केलेले ३४ हजार रुपये नालासोपारा पोलिसांनी परत मिळवून दिले आहेत. वेळीच तक्रार केल्याने पोलिसांनी लंपास केलेले पैसे गोठवून तक्रारदाराला परत मिळवून दिले आहेत.

नालासोपारा पश्चिमेच्या श्रीप्रस्थ येथे राहणारे किरण काळसेकर यांना सायबर भामट्याने फोन करून आपले वीज देयक थकीत आहे. त्वरित भरणा न केल्यास वीजपुरवठा खंडित केला जाईल, असे सांगितले. हे देयक भरण्यासाठी भामट्याने काळसेकर यांना एक लिंक पाठवली आणि 'टिम व्ह्यूवर' अॅपद्वारे त्यांच्या बँक खात्यातील ३४ हजार रुपये लंपास केले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येतात त्यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

पोलीस निरीक्षक राहुल सोनावणे आणि पोलीस उपनिरीक्षक योगेश मोरे यांनी त्वरित तपास सुरू केला. ही रक्कम 'पे यू' आणि 'लुडो किंग' या त्रयस्थ पोर्टलवर वळविण्यात आली होती. पोलिसांनी या संकेतस्थळांच्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून रक्कम गोठवली आणि नंतर ती तक्रारदार काळसेकर यांना परत केली.

**'तत्काळ तक्रार करा'**

सायबर गुन्हा घडल्यावर तत्काळ कारवाई करणे आवश्यक असते. गुन्ह्यातील लंपास केलेली रक्कम अन्य ठिकाणी वळवली जाते आणि नंतर तेथून ती काढण्यात येते. त्यामुळे तत्काळ तक्रार केल्यास फसवणुकीतील रक्कम परत मिळवता येते, असे नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी सांगितले. कुणाला 'ओटीपी' देऊ नये, अनोळखी व्यक्तींशी व्यवहार करू नयेत, असे आवाहन सुपे यांनी केले आहे.

4) म.टा. पान क्र. 5

# श्रद्धाचे वडील भेटले आयुक्तांना

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

श्रद्धा वालकर हत्येप्रकरणातील एसआयटी तपासाविषयी माहिती घेण्यासाठी श्रद्धाचे वडील विलास वालकर यांनी मंगळवारी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांची भेट घेतली. त्यांनी काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही भेट घेतली होती.

श्रद्धा वालकर या तरुणीच्या दिल्लीत झालेल्या हत्येची पोलिसांच्या विशेष पथकाकडून (एसआयटी) चौकशी करण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. त्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली, याची माहिती घेण्यासाठी विलास वालकर यांनी पोलिस आयुक्तांची भेट घेतली. यावेळी पांडे यांनी तपासासाठी एका अधिकाऱ्याची नियुक्ती करत चौकशी सुरू करणार असल्याचे वालकर यांना सांगितले. श्रद्धाने तसेच आपण स्वतः तक्रार केल्यानंतरही तुळींज व माणिकपूर पोलिसांनी तपासात दिरंगाई केल्याने त्यांच्यावर कार्यवाहीची मागणी आयुक्तांकडे केल्याचे वालकर म्हणाले.

5) पुढारी पान क्र. 4

# ऑनलाईन वीजबिल भरताना फसवणूक

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका व्यक्तीला अनोळखी व्यक्तीने वीज बिल भरण्याच्या नावाखाली ३४ हजार ३०० रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याची तक्रार सायबर गुन्हे कक्षास प्राप्त झाली होती. त्याची दखल घेत नालासोपारा पोलिसांनी केलेल्या प्रयत्नामुळे फसवणूक झालेली २६ हजारांची रक्कम तक्रारदाराला परत मिळवून देण्यास पोलिसांना यश आले.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत नालासोपारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एसटी स्टॅन्ड रोडवर असलेल्या इंद्रप्रस्थ इमारतीत राहणारे किरण शिवराम काळसेकर यांना ६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मोबाईलवर एक अनोळखी व्यक्ती एमएसईबी (महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ) मधुन बोलत असल्याचे भासवून त्यांच्या घराचे वीज बिल थकीत असल्याचे सांगितले. हे बिल न भरल्यास त्यांच्या घराचा वीज पुरवठा खंडित होईल. त्यामुळे वीजपुरवठा नियमित सुरू ठेवण्यासाठी तात्काळ ऑनलाईन बिल भरा, असे सांगून किरण यांना त्यांच्या मोबाईलवर एक लिंक पाठविली. ही लिंक किरण यांनी ओपन केली असता त्यावर टिम व्हिवर या ऍप्लिकेशनद्वारे अनोळखी व्यक्तीने किरण यांच्या बँक खात्यातून सुरुवातीला २६ हजार रुपये व त्यानंतर ८ हजार ३०० रुपये डेबिट केले. यानुसार किरण यांच्या बँक खात्यातून एकूण ३४ हजार ३०० रुपये डेबिट झाल्याचा मेसेज त्यांना मोबाईलवर प्राप्त झाला. यात आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच किरण यांनी तात्काळ नालासोपारा पोलीस ठाणे गाठून तक्रार अर्ज दाखल केला. त्याची दखल घेत पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे व उपनिरीक्षक योगेश मोरे यांनी किरण यांच्या बँकेत झालेल्या व्यवहाराची माहिती घेतली.

किरण यांच्या बँक खात्यातून डेबिट झालेली रक्कम पे यू व ल्युडो किंग या ऑनलाईन पेमेंट गेट वे वर क्रेडिट झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी त्वरित पे यू व ल्युडो किंगच्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून किरण यांच्या बँक खात्यातून डेबिट झालेली रक्कम तात्काळ डेबिट फ्रिज करून त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत ई-मेल केला. त्यापैकी पे यू या पेमेंट गेट वेचे नोडल अधिकाऱ्यांनी किरण यांची फसवणूक झालेल्या रकमेबाबत पडताळणी करून त्यांची २६ हजार रुपये त्यांच्या खात्यात क्रेडिट केल्याचे पोलिसांना सांगितले, तर उर्वरीत ८ हजार ३०० रुपयांची रक्कम किरण यांना परत मिळू शकली नाही. मात्र, पोलिसांनी तत्परता दाखविल्याने किरण यांची फसवणूक झालेली २६ हजार रुपयांची रक्कम परत मिळाली असली तरी मोबाईलवर अशा प्रकारचे येणारे फसवे कॉल अथवा एसएमएस तसेच ई-मेल वर प्राप्त होणाऱ्या मेलला भुलून लोकांनी त्याला प्रतिसाद देवू नये. तत्पूर्वी त्याच्या सत्यतेची पडताळणी करावी. मोबाईलवर प्राप्त होणारा ओटीपी किंवा वैयक्तिक माहिती कोणालाही देवू नये. ऑनलाईन फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तात्काळ लगतच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

CamScanner

६) सकाळ पू. पान क्र. १

दि. 19/01/2023

# वसई-विरारमधून ६३२ मुले बेपत्ता


## ४५२ मुलींचा समावेश; बेपत्ता होण्याचे वाढते प्रमाण चिंताजनक

प्रसाद जोशी : सकाळ वृत्तसेवा

**वसई, ता. १८ : वसई-विरार, मिरा-भाईंदर पोलिस आयुक्तालयाच्या परिमंडळ एक व दोनच्या कार्यक्षेत्रातून वर्षभरात एकूण ६३२ मुले-मुली बेपत्ता झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यात ४५२ मुलींचा समावेश असून अपहृत गुन्ह्यांची नोंद विविध पोलिस ठाण्यांत करण्यात आली आहे, पण मुले-मुली बेपत्ता होण्याचे वाढते प्रमाण पाहता पालकांसाठी ही चिंतेची बाब ठरत आहे.**

आजच्या धकाधकीच्या जीवनात पाल्यांकडे बऱ्याचदा लक्ष देण्यास वेळ मिळत नाही. आपला मुलगा, मुलगी काय करते याचा पत्तादेखील त्यांना नसतो. त्यातच प्रेम प्रकरण, पालकांकडून मिळालेला ओरडा, स्वतंत्र जीवन जगण्याची उत्सुकता किंवा नोकरी करून स्वावलंबी होण्याचा विचार अशा विविध कारणांनी अनेक मुले घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडतात; तर अनेकदा काही जणांना प्रेमाची फूस लावून पळवून नेले जाते. या हरवलेल्या मुला-मुलींची तक्रार दाखल केल्यावर जर चोवीस तासांत शोध लागला नाही तर अपहरणाचा गुन्हा दाखल केला जातो आणि त्या दृष्टीने पोलिसदेखील तपास करतात. पण शहरातील मुले बेपत्ता होण्याचे वाढते प्रमाण पालकांसाठी चिंताजनक ठरत आहे.

एकीकडे मोबाईल, समाज माध्यमांचा वापर वाढल्याने मुलांमध्ये बाहेरच्या जगाची उत्सुकता वाढते. तसेच अनोळखी व्यक्तींबरोबर मैत्री वाढते, मित्र-मैत्रिणींसोबत दूर जाण्याचा विचार येतो. अशातून ही मुले घर सोडून जातात व काही वेळानंतर चूक लक्षात येते व पुन्हा घरचा रस्ता धरतात. काहींना सीसी टीव्हीचा आधार किंवा अन्य पुराव्यांच्या मदतीने पोलिस शोधून पालकांच्या स्वाधीन करतात. अशात वसई-विरार, मिरा-भाईंदर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतून पळून गेलेल्या मुलांची संख्या पाहता पोलिसांकडून समुपदेशन मोहीम हाती घेतली आहे.





### मुले का घर सोडतात?


१ घरच्यांवर रागावून अभ्यास किंवा अन्य बाबींचा तगादा लावणे

२ मित्रांसोबत मौजमस्ती करण्यासाठी पालक व्यग्र असल्याने होणारे दुर्लक्ष

३ प्रेम प्रकरण फिरण्याची आवड पूर्ण न होणे

घरातील सर्व सदस्य नोकरीनिमित्त घराबाहेर जातात. त्यामुळे शाळेनंतर मुले घरात एकटीच असतात. अशात एकत्र कुटुंब पद्धती कमी झाली आहे. त्यामुळे मुलांना येणाऱ्या अडचणी, एकांत दूर करण्यासाठी आपल्या हक्काची व्यक्ती त्यांच्याजवळ नसते. त्यामुळे मुलांमध्ये बाहेरच्या जगाचे आकर्षण अधिक वाढते आणि ते घर सोडून जातात, असे मानसोपचार तज्ज्ञांनी सांगितले.




मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय क्षेत्रात टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स यांच्या सहकार्याने वसईत लहान मुलांसाठी समुपदेशन केले जात आहे. जी मुले घर सोडून जातात व त्यांचा शोध लागतो त्यांना मार्गदर्शन केले जाते, पण असे प्रकार टाळण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्याशी संवाद साधला पाहिजे.
**- तेजश्री शिंदे**, अधिकारी, भरोसा सेल, मिरा-भाईंदर, वसई विरार आयुक्तालय

सध्याच्या आधुनिक युगात घरातील सर्व सदस्य नोकरी करतात. तसेच एकत्र कुटुंब पद्धती कमी झाली आहे. त्यामुळे मुलांना येणाऱ्या अडचणी, एकांत दूर करण्यासाठी आपल्या हक्काची व्यक्ती त्यांच्याजवळ नसते. यामुळे मुलांची चिडचिड होते, तर अनेक मुले घर सोडून जातात किंवा आपला रस्ता वेगळा शोधतात. त्यामुळे असे प्रकार रोखण्यासाठी पालकांनी मुलांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणे गरजेचे आहे.
**- वंदना पवार**, मानसोपचार तज्ज्ञ

CS CamScanner

CS CamScanner

७) सकाळ पू. पान क्र. ३

दि. 19/01/2023

# शाळांमध्ये नशामुक्ती अभियान राबवा

## मनसेची तुळिंज पोलिसांकडे मागणी



**वसई :** नालासोपारा शहरातील समस्या मांडत मनसे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्याकडे शाळांमध्ये नशामुक्ती अभियान राबवण्याची मागणी केली.

वसई, ता. १८ (बातमीदार) : नव्याने तुळिंज पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून रुजू झालेले शैलेंद्र नगरकर यांची भेट घेत मनसेच्या कार्यकर्त्यांनी नालासोपारा शहरातील समस्यांबाबत माहिती दिली. यावेळी शाळांमध्ये नशामुक्ती आणि विद्यार्थिनींना आत्मरक्षणाचे धडे देणारे अभियान राबवा, अशी मागणी देखील करण्यात आली.

मनसेचे नालासोपारा शहर सचिव राज नागरे यांनी नव्याने पदभार स्वीकारलेले वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांचे स्वागत केले. याप्रसंगी नालासोपारा शहरातील अनधिकृत नायजेरियन, बांगलादेशी नागरिकांचे वास्तव्य, अवैध फेरीवाले, रिक्षावाले आणि बेकायदा पार्किंगवर आळा घालण्यात यावा; तसेच पानटपरीवर गुटखा, नशेच्या गोळ्या विकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच शहरात नशामुक्ती अभियान, शालेय विद्यार्थिनींसाठी आत्मसंरक्षण, तसेच महिला कायद्याबाबत महिला पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक शाळेत अभियान राबविण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली. यावेळी नालासोपारा शहर सचिव राज नागरे, किशोर कारेकर, महिला उपजिल्हाध्यक्ष श्रद्धा राणे, कला नायर, समाजसेविका अर्चना नलावडे, गोपाळ वांद्रे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

८) पुढारी पु. पान क्र. २



# मिरा-भाईंदरमध्ये रस्ता सुरक्षा अभियान

**मिरारोड :** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये होणारे रस्ता अपघात कसे टाळावेत याबाबत जनजागृती करणे तसेच वाहतूक नियमांचे नागरिकांनी पालन करावे हा मुख्य उद्देश समोर ठेवून ११ ते १७ जानेवारी या कालावधीत वाहतूक शाखा काशिमिरा, अंबाडी नाका, वसई, विरार विभाग यांच्यावतीने महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२३ राबविण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता १७ जानेवारी रोजी विश्वकर्मा हॉल, वीर सावरकर नगर, वसई पश्चिम येथे पार पडला. यावेळी प्रकाश गायकवाड, पोलीस उपायुक्त, मुख्यालय यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर करताना रस्ते अपघाताची माहिती देऊन रस्ते अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर फेलीक्स मच्याडो (बिशप) यांनी शहरवासीयांना वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत संदेश दिला. या प्रसंगी मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय यांनी उपस्थित अधिकारी , अंमलदार, वाहन चालक, मालक संघटनेचे पदाधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिक यांना वाहतुकीचे नियम पाळण्यासह पोलीसांना आपलाच मित्र मानून सहकार्य करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास प्रकाश गायकवाड, पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ तथा अतिरिक्त कार्यभार २, सुहास बावचे, सहायक पोलीस आयुक्त कैलास चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा अति. कार्यभार वसई विभाग, पद्मजा बडे, फेलिक्स मच्याडो (बिशप) व इतर अधिकारी, अंमलदार, नागरिक उपस्थित होते.

९) लोकमत पु. पान क्र. ३

# गाडी न धुतल्याने रखवालदारासच धुतले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** गाडी धुतली नाही, म्हणून इमारतीतील रहिवाशाने रखवालदारास बेदम मारहाण केल्याची घटना मीरा रोडच्या नयानगर भागात घडली. रणसिंह कामी (४०) हे अस्मिता लोटस इमारतीत रखवालदार आहेत. मंगळवारी रात्री कामी हे कर्तव्यावर असताना त्याच इमारतीत राहणारे शेख जफर हसमतुल्ला यांनी गाडी का धुतली नाही, म्हणून त्यांना जाब विचारला.

गाड्या जास्त होत्या म्हणून धुतली नाही, असे त्यांनी सांगितल्यावर हसमतुल्ला याने शिवीगाळ करीत ठोशा-बुक्क्यांनी आणि गाडीच्या चावीने कामी यांना बेदम मारहाण केली. रुग्णालयात उपचार घेऊन नंतर कामी यांनी नयानगर पोलिसात दिलेल्या फिर्यादीनंतर पोलिसांनी हसमतुल्लाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

दि. 19/01/2023

10) लोकमत पु. पान क्र.4

# रक्ताच्या नात्यालाही अखेरचे दर्शन घ्यावे असे का वाटत नाही?

## अनोळखी मृतदेहांवर पोलिसच करतात अंत्यसंस्कार

**धीरज परब**


लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा- भाईंदर शहरात अनोळखी मृतदेह मुख्यत्वे समुद्र अथवा खाडीकिनारी लागलेले आढळून येतात. याशिवाय रस्ते- पदपथावर राहणारे भिकारी वा अन्य कारणांनी राहणाऱ्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर ओळख पटवणे हे पोलिसांसमोर आव्हान असते.

अनेकवेळा ओळख पटली तरी त्याचे वारस सापडत नाहीत. अनोळखी मृतदेह सापडल्यावर तो शवविच्छेदन व शवागारात नेण्याची तसेच त्याची ओळख पटवण्यापासून तो वारसांना हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पोलिसच करतात. वारस नसल्यास अंत्यविधी करण्याचे कार्य पोलिसच करतात. काहीवेळी खासगी रुग्णवाहिकांचा खर्चही करतात.

### अंत्यसंस्काराचा खर्च करायचा कोणी?

बेवारस मृतदेहांवर मीरा- भाईंदर महापालिकेच्या गॅसवरील शवदाहिनीत पालिकेच्या वतीने मोफत अंत्यविधी केला जातो; परंतु, मृतदेहाच्या कफनपासून अन्य साहित्यांसाठी लागणारा खर्च पोलिस स्वतःच्या खिशातूनच करतात. अनोळखी मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करणे हे पुण्याचे कार्य मानून पोलिस अंत्यसंस्काराचा खर्च करतात.



### केवळ आठ मृतदेहांची ओळख पटली

मीरा- भाईंदरमध्ये २०२२ या वर्षात ५३ अनोळखी मृतदेह आढळले. त्यातील केवळ आठ मृतदेहांची ओळख पटली. पोलिसांतर्फे सुमारे ४९ मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### काय केले जाते या अनोळखी मृतदेहांचे?

अनोळखी मृतदेह सापडल्यानंतर पोलिस पंचनामा करून पालिका किंवा शासनाच्या रुग्णवाहिका, शववाहिनीद्वारे भाईंदरच्या पंडित भीमसेन जोशी रुग्णालयातील शवागारात नेतात. शवविच्छेदन होऊन मृतदेह शीतपेटीत ठेवला जातो.

### रक्ताच्या नात्यासाठी सात दिवस वेटिंग

अनोळखी मृतदेह सापडल्यानंतर त्याचे वारस अथवा परिचित व्यक्ती शोधण्यासाठी पोलिसांकडून विविध प्रयत्न केले जातात. काहीवेळा ते प्रयत्न अपुरे पडतात. काही मृतदेह कुजलेले असतात. मृतदेहाचे वारस सापडावेत व त्यांची ओळख पटावी, यासाठी मृतदेह सात दिवस शवागारात ठेवला जातो.

बेवारस मृतदेहांवर होणारा विविध साहित्य खर्च व अंत्यसंस्कार करण्याचे कार्य पोलिस स्वतःच्या खर्चातून माणुसकीच्या दृष्टीने करतात. आतापर्यंत अनेक बेवारस मृतदेहांचे वारस पोलिसांनी शोधले आहेत. अनेकवेळा मृतदेह ओळखण्याच्या पलीकडे असतात. बेवारस मृतदेहांचे वारस शोधण्याचे प्रमाण वाढवण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत.

**- विलास सानप, सहायक पोलिस आयुक्त**

CamScanner

दि. 19/01/2023

11) सकाळ पु. पान क्र. 1

12) पुण्यनगरी पु. पान क्र. 1



**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांनी आंदोलन केले.

# महापालिकेचे कर्मचारी रस्त्यावर

## आयुक्तांच्या वाहनावरील हल्ल्याचा निषेध

वसई, ता. १८ (बातमीदार) : काही दिवसांपूर्वी वसई-विरार महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या वाहनाची काच मुख्यालयासमोर फोडण्यात आली. त्यानंतर मंगळवारी मनसेकडून पालिका विभागीय सहाय्यक आयुक्त ग्लिसन गोन्साल्विस यांना अपशब्द वापरण्यात आले होते. यामुळे संतप्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरत निषेध व्यक्त केला.

आयुक्त अनिलकुमार पवार हे प्रशासक म्हणून कामकाज पाहत असताना त्यांच्या वाहनावर हल्ला करण्यात आला होता. महापालिकेच्या नवघर-माणिकपूर विभागीय कार्यालयात मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक आयुक्त ग्लिसन गोन्साल्विस यांना कामाचा जाब विचारण्यासाठी घेराव घातला. त्यावेळी त्यांना अपशब्द वापरले होते. याचे पडसाद बुधवारी उमटले. महापालिकेच्या कर्मचारी, अधिकारी अभियंत्यांनी हाताला काळी फीत बांधत कार्यालयाखाली या हल्ल्याचा निषेध नोंदवत आंदोलन केले. त्यामुळे वातावरण तापले होते. या आंदोलनात सहाय्यक आयुक्त ग्लिसन घोन्सालवीस, कार्यालय अधीक्षक भालचंद्र मानकर, अभियंता विवेक चौधरी, संजय पाटील यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

# मनसेविरोधात पालिका कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**वसई :** मनसेचे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी प्रभाग एचचे सहाय्यक आयुक्त गील्सन गोन्साल्वीस यांना त्यांच्या कार्यालयात जाऊन धमकी दिल्याने पालिका कर्मचारी मनसेच्या विरोधात आक्रमक झाले असून बुधवारी त्यांनी काळ्या फिती बांधून प्रभाग कार्यालयाच्या बाहेर आंदोलन केले. 'नही चालेगी नही चलेगी... मनसे की दादागिरी नही चलेगी'च्या घोषणा देण्यात आल्या. यापूर्वी अविनाश जाधव यांनी तत्कालीन पालिका आयुक्त डी. गंगाथरन यांना शिवीगाळ केली होती. त्यामुळे वसई-विरार पालिका कर्मचारी चांगलेच आक्रमक झाले होते. याप्रकरणी पोलीस उपायुक्तांकडे तक्रारी अर्ज देण्यात आला आहे. मात्र माणिकपूर पोलीस ठाण्यात अद्याप कोणताही गुन्हा दाखल झाला नसल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांनी सांगितले.

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष : 26 अंक-216 मुंबई, गुरुवार 19 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# यातायात नियमों का पालन करें व पुलिस को अपना मित्र मानकर सहयोग करें : एमबीवीवी पुलिस



**मुकेश त्रिपाठी**

**वसई :** महाराष्ट्र राज्य सड़क सुरक्षा मिशन 2023 का समापन समारोह मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्र में उच्च अधिकारियों के बीच संपन्न हुआ,यह जानकारी पुलिस अधिकारी ने बुधवार को दी है।पुलिस ने बताया कि,मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्र में सड़क दुर्घटनाओं से बचने और यातायात नियमों का पालन करने के बारे में जन जागरूकता पैदा करना मुख्य उद्देश्य को ध्यान में रखते हुए यातायात शाखा काशीमीरा,वसई, विरार प्रमंडल द्वारा दिनांक 11 जनवरी से 17 जनवरी तक महाराष्ट्र राज्य सड़क सुरक्षा मिशन 2023 का क्रियान्वयन किया गया।कार्यक्रम का समापन 17 जनवरी को वसई पश्चिम में हुआ, उक्त अवसर पर प्रकाश गायकवाड,पुलिस उपायुक्त,मुख्यालय ने कार्यक्रम की शुरूआत करते हुए सड़क दुर्घटनाओं की जानकारी दी और सड़क दुर्घटनाओं को रोकने के लिए सावधानी बरतने के बारे में निर्देशित किया।उसके बाद फेलीक्स डमच्याडो (बिशप) ने शहरवासियों को यातायात नियमों का पालन करने का संदेश दिया,इस अवसर पर मधुकर पाण्डेय, पुलिस आयुक्त मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय, अधिकारी/कर्मचारी, वाहन चालक/मालिक संघ के पदाधिकारी उपस्थित रहे। नागरिकों से प्राप्त शिकायतों का जल्द से जल्द निस्तारण कराने के लिए सभी थाना प्रभारियों को प्रथम सत्र में प्रत्येक शनिवार को शिकायत निवारण दिवस मनाने की समझाइश दी गई। कार्यक्रम में पुलिस आयुक्त मधुकर पाण्डेय,डीसीपी, प्रकाश गायकवाड, डीसीपी (परिमंडल 3 व अतिरिक्त कार्यभार 2 ) सुहास बावचे,एसीपी यातायात विभाग कैलास चव्हाण,आर्थिक गुन्हे शाखा,अति. कार्यभार वसई विभाग पद्मजा बडे,फेलीक्स मच्याडो (बिशप) व अन्य अधिकारी / कर्मचारी तथा नागरिक उपस्थित थे।

CS CamScanner

पे स्लिप से चल रही कुमार में डॉन की वसूली
पेज-3

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

MHT

# मुंबई हिंदमाता टाइम्स

मुंबई, बुधवार 18 जनवरी 2023

अजय देवगन की 'भोला' में दबंग किरदार में नजर आएंगी तब्बू
पेज-6

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाज़ार | सराफा बाज़ार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079 | 07.15 am / 06.23 pm | | 29°C / 20°C | NSE / BSE | |


# मकान किराए पर है देना तो

# पुलिस को सूचित जरूर करना

- विदेशी नागरिकों के चलते बढ़ रहे हैं आपराधिक मामले


MHT संवाददाता
राकेश सिंह


नालासोपारा। मीरा-भायंदर, वसई-विरार आयुक्तालय ने लोगों को पहले ही निर्देश दिया था कि वह अपने क्षेत्र में ठहरने वाले विदेशी नागरिकों पर नजर रखें। मीरा-भायंदर, वसई-विरार आयुक्तालय में, विशेष रूप से वसई तालुका और नालासोपारा शहर में, नाइजीरियन, बांग्लादेशी और अन्य विदेशी नागरिक बढ़ रहे हैं और उनके द्वारा होने वाली परेशानी बढ़ रही है। इन सब पर लगाम लगाने के लिए एमबीवीवी पुलिस आयुक्तालय मधुकर पांडेय ने एक मुहिम शुरू की है। नाइजीरियाई और बांग्लादेशी नागरिकों की बढ़ती अपराध दर को देखते हुए, इन नागरिकों को अपने घरों को किराए पर देने से पहले स्थानीय पुलिस को अपनी जानकारी देना अनिवार्य कर दिया गया है।

## तो मकान मालिक पर होगा मामला दर्ज

पुलिस के लिए परेशानी यह है कि बड़ी संख्या में नाइजीरियन और बांग्लादेशी मादक पदार्थों के कारोबार और ऑनलाइन ठगी के धंधे में लिप्त हैं। इनमें से बड़ी संख्या में ऐसे विदेशी नागरिक हैं, जो बिना वैध दस्तावेजों के रह रहे हैं। पुलिस ने यह भी कहा है कि ऐसा नहीं करने पर स्थानीय नागरिकों के खिलाफ भारतीय दंड संहिता की धारा 188 के तहत मामला दर्ज किया जाएगा। वसई तालुका के नालासोपारा शहर में बड़ी संख्या में नाइजीरिया और अन्य विदेशी नागरिक रह रहे हैं। विरार, वसई, नायगांव, नालासोपारा, भायंदर, मिरारोड में सस्ते फ्लैट उपलब्ध होने के कारण इन क्षेत्रों में विदेशी नागरिक बड़ी संख्या में रह रहे हैं। पुलिस के मुताबिक, इनमें से कई नाइजीरियन मादक पदार्थों की तस्करी और लॉटरी धोखाधड़ी में शामिल हैं।




## नियमों का करें पालन

जानकारी के अनुसार अपराधियों और विदेशी नागरिकों पर अंकुश लगाने के लिए, आयुक्त ने 9 फरवरी तक मीरा भायंदर वसई विरार आयुक्तालय में दंड प्रक्रिया संहिता, 1973 की धारा 144 (1) (2) के तहत कानूनी प्रक्रिया आदेश जारी किया है। पुलिस ने आदेश दिया है कि विदेशी नागरिकों को मकान, दुकान, होटल और जमीन किराए पर देने से पहले अपने क्षेत्र के पुलिस स्टेशन को सूचित किये बिना किराये पर नहीं दिया जाये। इसके साथ ही यह भी आदेश है कि अगर एग्रीमेंट पर दिया जा चुका है, तो इसकी सूचना तत्काल स्थानीय पुलिस को दी जाए और अगर स्थानीय नागरिक इन नियमों का उल्लंघन करते हैं, तो उनके खिलाफ भारतीय दंड संहिता की धारा 188 के तहत कार्रवाई की जाएगी।

CamScanner

मुंबई से चोरी की ऑटोरिक्शा से राजस्थान में करते हैं खेती
...पेज-3

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

MHT

# मुंबई हिंदमाता टाइम्स

मुंबई, गुरुवार 19 जनवरी 2023

फिर 'मसीहा' बने सोनू सूद
...पेज-6

संपादक: विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष-18, अंक-09 | पृष्ठ-8 | मूल्य ₹5/- | संरक्षक: राजन पांडेय / सुमित आचार्य

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, पौष कृष्ण पक्ष चतुर्दशी | 07.15 am / 06.25 pm | कल की तुलना में आज मौसम थोड़ा ठंडा रहेगा। | अधिकतम 28°C / न्यूनतम 19°C | NSE Open 17,922.80 \| Close 18,074.30; BSE Open 60,716.03 \| Close 61,045.74 | Rs. 58,380 Per 10 gm; Rs. 72,200 Per Kg |




## वसई में सिर्फ 352 शस्त्र लाइसेंस

# नगरसेवकों, उद्यमियों, गृहणियों को चाहिए बन्दूक

MHT संवाददाता

नालासोपारा। पिछले कुछ वर्षों से शस्त्र लाइसेंस धारकों की संख्या तेजी से बढ़ रही है। वसई तालुका में पालघर कलेक्टर के कार्यकाल से अब तक 351 लाइसेंस जारी किए गए हैं। नए पुलिस आयुक्तालय बनने पर मीरा-भायंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय से अभी तक 1 नया लाइसेंस जारी किया गया है।

नई शस्त्र लाइसेंसिंग व्यवस्था पुलिस आयुक्तालय के लाइसेंसिंग कार्यालय से शुरू की गई है। आयुक्तालय में लाइसेंसिंग शाखा 27 दिसंबर 2020 से शुरू हुई है। इससे पहले पालघर और ठाणे जिला प्रशासन से शस्त्र लाइसेंस जारी किए जाते थे।

### 3 साल से बढ़ा 5 साल किया नवीनीकरण का समय

आत्मरक्षा के लिए हथियारों के इस्तेमाल का लाइसेंस पुलिस प्रशासन के कार्यालय और कलेक्टर द्वारा जारी किया जाता है। भले ही हर साल इस शस्त्र लाइसेंस का नवीनीकरण होता है, लेकिन संबंधित व्यक्ति को शस्त्र लाइसेंस की जरूरत है या नहीं और किस कारण से लाइसेंस लिया जाता है, इसकी पूरी जानकारी ली जाती है। पहले इसका नवीनीकरण 3 साल बाद होता था, लेकिन अब इस सीमा को बढ़ाकर 5 साल कर दिया गया है।

**पुराने लाइसेंस- 351, नए लाइसेंस- 1)**

### कैसे मिलता है लाइसेंस

फॉर्म भरने के बाद सभी आवश्यक दस्तावेज संलग्न कर कार्यालय में जमा करना आवश्यक होगा है। फॉर्म जमा करने के कुछ दिनों बाद, यह देखने के लिए एक आवश्यक जांच की जाती है, कि आवेदक का आपराधिक रिकॉर्ड है या नहीं। एक आपराधिक रिकॉर्ड की जांच की जाती है। एक तरह से साक्षात्कार आयोजित किया जाता है। एक लाइसेंस तब दिया जाता है जब सभी जानकारी संतोषजनक ढंग से मिलती है। पहचान और पते के प्रमाण की आवश्यकता होती है। पासपोर्ट साइज फोटोग्राफ, वोटर आईडी कार्ड, पिछले तीन साल का इनकम टैक्स रिटर्न जमा करना होगा। इसके अलावा आपके मोहल्ले के दो सज्जन व्यक्तियों का चरित्र प्रमाण पत्र, फिटनेस प्रमाण पत्र, शैक्षिक प्रमाण पत्र और जन्म प्रमाण पत्र।

### नहीं दे सकते हैं जानकारी

**जनप्रतिनिधियों सहित कई गणमान्य व्यक्तियों के पास वसई में लाइसेंस हैं, लेकिन सुरक्षा की दृष्टि से हम यह जानकारी नहीं दे सकते कि वास्तव में लाइसेंस किस-किस के पास है।**

**- एमबीवीवी पुलिस प्रशासन**

CamScanner

आपलं महानगर My महानगर

# बांगलादेशी नागरिकाला अटक

भाईंदर । भारतीय सीमेवरील गस्तीपथकाचे नजर चुकून बेकायदेशीरपणे भारतात येऊन बेकायदेशीरपणे वास्तव्य करत असलेल्या अफजल बकरअली मंडल (३७) याला एका कंपनीतून अटक करण्यात आली आहे. नवघर पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून भाईंदर पुर्वेकडील दोषी इंडस्ट्रीयल इस्टेटमधील मे. बजरंग स्टील कंपनीत काम करत असलेल्या अफजल मंडलला ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी तो गेल्या सहा महिन्यांपासून बेकायदेशीरपणे भाईंदरमधील बंगा संघा झोपडपट्टीत रहात असून कंपनीत काम करत असल्याचे आढळून आले. त्याच्याजवळ पासपोर्ट अथवा इतर कोणतीही कागदपत्रे आढळून आली नाहीत.

AaplaMahanagar Edition
Jan 19, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

CamScanner

पोलीस भरतीसाठी आलेल्यांसाठी निवास व्यवस्था, पोलिसांकडून मार्गदर्शन

# महिला उमेदवार तणावमुक्त



## जिल्ह्यासह राज्यभरातून महिला उमेदवार येणार

# वसई -विरार महापालिका निवडणूक ताकदीनिशी लढणार



## वसईच्या प्रवासाला गतिरोधकांचा अडथळा

आवश्यक सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित; दुर्घटनेनंतर पाच वर्षांनी पुन्हा सज्ज

## डहाणू किनाऱ्यावर पर्यटकांसाठी बोट सफर



### पर्यटकांसाठी सुविधा आवश्यक

## कर्करोगावरील संशोधनाला भरपूर वाव : डॉ. जेम अब्राहम

## २०० खाटांच्या रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मंजुरी



## कुपोषण समूळ नष्ट करण्यासाठी टास्क नेमा



# आरएमसी प्लांटचे प्रदूषण मिरचीसाठी तिखट



## वसई-विरार महापालिकेचे कर्मचारी रस्त्यावर



लोकमत

# घरात धारधार शस्त्रे कशाला? कोठडीत जावे लागेल भावा!

## शस्त्र बाळगणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : गुन्हेगारीमध्ये वर्चस्व राहिले पाहिजे, आपली दहशत कायम राहून लोकांनी आपल्याला घाबरले पाहिजे. राडा करता आला पाहिजे, या आणि अशा अनेक कारणांनी जिल्ह्यात देशी कट्ट्यांसह धारदार शस्त्र बाळगणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे. मात्र, असे असले तरी गेल्या वर्षात म्हणजेच २०२२ मध्ये विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्यांवर पोलिसांनी धडक कारवाया केल्या आहेत. अशा राडाबहाद्दरांना जेलची हवा खावी लागत असल्याचे चित्र आहे.

पोलिस आयुक्तालयात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. अशातच घातक शस्त्राच्या बळावर शारीरिक व मालमत्तेचे गुन्हे घडू नयेत, यासाठी स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखा, मध्यवर्ती गुन्हे शाखेतील पोलिस अधिकारी, कर्मचारी शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करीत आहेत. मागील वर्षात स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखा, मध्यवर्ती गुन्हे शाखेतील पोलिस अधिकारी, कर्मचारी यांनी आर्म ॲक्टच्या अनेक कारवाया करून अनेक गुन्हेगारांना अटक केली आहे. तर २०23 या वर्षातही या कारवायांना गती दिली जाणार असल्याची माहिती पोलिस विभागाने दिली आहे.



### लाखात मिळते अवैध पिस्तूल

सूत्रांच्या माहितीनुसार, ५० हजारांपासून ते दोन लाखांपर्यंत पिस्तूल सहज उपलब्ध होते. त्यामुळे शस्त्रांची तस्करी करणाऱ्यांची पाळेमुळे खणून काढण्याचे आव्हान पोलीस यंत्रणेसमोर आहे.

### स्टेटस ऑफ सिम्बॉल !

तरुणांमध्ये पिस्तुलाचे मोठे आकर्षण आहे. 'स्टेटस ऑफ सिम्बॉल' म्हणूनही अनेकजण विनापरवाना पिस्तूल बाळगतात. अनेकजण पिस्तूलसह फोटो काढून चमकोगिरी करतात. वाढदिवसाला तलवारीने केक कापण्याचे फॅडही तरुणाईत आहे.

### यूपी, बिहार कनेक्शन

पोलिस आयुक्तालयात आतापर्यंत पकडलेल्या बेकायदेशीर पिस्तूल प्रकरणाचे धागेदोरे थेट उत्तर प्रदेश व बिहारमध्ये निघाले आहेत. येथूनच वसई -विरारमध्ये अवैध शस्त्रे येतात, अशी सूत्रांची माहिती आहे.

बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध स्थानिक पोलिस ठाणे, गुन्हे शाखेच्या टीम वेळोवेळी मोहिमा राबवून धरपकड केलेली आहे. शस्त्रांची तस्करी करणाऱ्यांची पाळेमुळे शोधून काढली जातील.

- पोलिस प्रशासन

### अवैध शस्त्रांवरील कारवाया

| वर्ष | दाखल गुन्हे | आरोपी अटक | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २०१९ | १६ | ३२ | देशी कट्टे ११, पिस्टल ८, काडतुसे ४१ |
| २०२० | ३ | ४ | गावठी कट्टे २, बनावट पिस्टल १ |
| २०२१ | १५ | ३२ | देशी कट्टे १५, पिस्टल २, काडतुसे २५ |



CamScanner

लोकमत



याहतूक शाखा काशिमीरा, वसई, विरार विभागांच्या वतीने राबविण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा अभियानाच्या सांगता कार्यक्रमास उपस्थित वाहतूक पोलिस.

# रस्ता सुरक्षा अभियानातून वाहतूक नियमांचे धडे

## वसई पश्चिमेत सांगता, नागरिकांचा प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये होणारे रस्ता अपघात कसे टाळावेत, यावाबत जनजागृतीसह वाहतूक नियमांचे नागरिकांनी पालन करावे, हा मुख्य उद्देश समोर ठेवून ११ ते १७ जानेवारीच्या कालावधीत वाहतूक शाखा काशिमिरा, वसई, विरार विभागांच्या वतीने महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता मंगळवारी विश्वकर्मा हॉल, वीर सावरकर नगर, अंबाडी नाका, वसई पश्चिम येथे झाली.

मुख्यालयाचे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर करताना रस्ते अपघाताची माहिती देऊन रस्ते अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर बिशप फेलिक्स मच्याडो यांनी शहरवासीयांना वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत संदेश दिला. याप्रसंगी पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय यांनी वाहतुकीचे नियम पाळण्यासह पोलिसांना मित्र मानून सहकार्य करण्याबाबत आवाहन केले. नागरिकांकडून कार्यक्रमास उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमास पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय, मुख्यालयाचे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, परिमंडळ-३ चे पोलिस उपायुक्त सुहास बावचे, वाहतूक विभागाचे सहायक पोलिस आयुक्त कैलास चव्हाण, सहायक पोलिस आयुक्त पद्मजा बडे, बिशप फेलिक्स मच्याडो आदी उपस्थित होते.



CS CamScanner

पोलिसांची मदत घेण्याचे आवाहन

# आत्महत्येचा विचार आला; या नंबरवर करा फोन

**मंगेश कराळे**

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** आजारग्रस्त, मानसिक-कौटुंबिक तणाव, प्रेम प्रकरण व कर्जाचे डोंगर असलेल्या व्यक्ती आत्महत्येचा मार्ग पत्करीत आहेत. संयम न बाळगता धीर सोडणाऱ्या व्यक्तींना आत्महत्या हा एकमेव मार्ग दिसत असतो. तणावात असलेले ते परिस्थितीशी लढायचे धाडस सोडून आत्महत्येचा मार्ग पत्करीत असतात. अशा लोकांनी समुपदेशनासाठी पोलिसांची मदत घेणे गरजेचे आहे.

कोरोना संकटाने उद्योगधंदे-व्यवसाय बंद पडले, नोकऱ्या गेल्या, बेरोजगारी वाढली, कुटुंब कसे चालवायचे हा प्रश्न उभा राहिला, जिव्हाळ्याची माणसे गेली, नैराश्यमय वातावरणात अनेकांना जगणे असह्य झाले, कमकुवत मनाच्या लोकांत नैराश्येची भावना वाढली व आत्महत्येचे टोकाचे निर्णय घेतले. शेकडो जणांनी आत्महत्या केल्याची पोलिसांत नोंद आहे. नैराश्यात असणाऱ्यांना आधाराची गरज असते.



## वर्षभरात शेकडो जणांचा आत्महत्येचा प्रयत्न

- मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या प्रत्येक पोलीस ठाण्यात सरासरी दोन किंवा तीन दिवसात एक जण आत्महत्या करीत आहे.
- मागील वर्षभराच्या कालावधीत शेकडो (महिला आणि पुरुष) जणांनी आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. आत्महत्येची खरी आकडेवारी याहूनही कितीतरी पटीने जास्त आहे.

## आयुक्तालयात प्रेरणा प्रकल्प नाही

पोलीस आयुक्तालयाला दोन वर्षे उलटूनही प्रेरणा प्रकल्प अद्याप सुरू झालेला नाही. येथे ११२ टोल फ्रीवर आत्महत्या करणाऱ्याने कॉल केल्यावर स्थानिक पोलीस ठाण्याला कळविण्यात येते. या ठिकाणी पोलिस जाऊन आत्महत्या करणाऱ्याचे समुपदेशन केले जाते.

कोरोनामुळे नैराश्य, काळजी, चिंता याचे आजार वाढले. अशांना मानसिक आधाराची गरज असते. प्रसंगी अशा व्यक्तींना समुपदेशन अथवा मानसोपचारतज्ज्ञाकडून उपचार करून घेणे योग्य राहील.

- डॉ. संदीप सरताळे



## कुटुंबाने काळजी घेण्याची गरज

संकटामुळे माणसावर आर्थिक, मानसिक दडपण असल्यास कुटुंबातील सदस्याने एकोप्याने राहिले पाहिजे. नैराश्य आले, त्याला एकटे नाही, कुटुंब व मित्रपरिवार सोबत आहे, याची जाणीव करून द्यावी. भावना व्यक्त झाल्या पाहिजे, माणसातील नैराश्य, भयगंड कमी करून विश्वासाची भावना निर्माण झाली पाहिजे.

## आत्महत्येची कारणे काय?

मानसिक आजारग्रस्त, वैफल्य, कौटुंबिक तणाव, प्रेम प्रकरण व कर्जाचे डोंगर आत्महत्येचा मार्ग पत्करत आहे. संयम न बाळगता धीर सोडणाऱ्या व्यक्तींना आत्महत्या हा एकमेव मार्ग दिसत असतो.



CamScanner